THE RIGHT KIND OF PEOPLE

**September 4, 2022**

To
The General Manager
Capital Market (Listing)
**National Stock Exchange of India Limited**
Exchange Plaza, BKC
Bandra-Kurla Complex,
Bandra (East), Mumbai – 400051.

Symbol: AISL

**Subject: Disclosure under Regulation 30, 44 and 47 of the SEBI (Listing Obligations and Disclosure Requirements) Regulations, 2015 regarding Newspaper Advertisement of Notice of Annual General Meeting, Remote e-voting.**

Dear Sir/Madam,

Pursuant to Regulation 47 of the Securities and Exchange Board of India (Listing Obligations & Disclosure Requirements) Regulations, 2015, please find enclosed herewith the extract of Newspaper advertisements for Publication of information 13th Annual General Meeting of the Company to be held on Monday, September 26, 2022, at 4.00 p.m. through Video Conference ('VC')/Other Audio-Visual Means ('OAVM'), including details with respect to remote e-voting information.

The notice was published today i.e., Sunday, September 4, 2022 in:
1. Financial Express
2. Pratahkal

This disclosure is also being uploaded on the Company's website at www.aniintegratedservices.com

Kindly take the same on record.
**For ANI Integrated Services Limited**

Akshay Navin Korpe
Digitally signed by Akshay Navin Korpe
Date: 2022.09.04 14:20:52 +05'30'

**Mr. Akshay Navin Korpe**
**Director**
**DIN:** 02201941
**Address:** Flat No. 6, Ashirwad
G.V. Scheme Road No. 1
Mulund East Mumbai 40008

# पांढरे केस?



केसांवर आपलं किती प्रेम असतं ना? ते गळू नयेत म्हणून किती उपाय, काळजीपूर्वक केलेल्या मोहक हेअरस्टाइल्स, कितीतरी तेलं, शॅम्पू, कंडीशनर्स, जेल... सुंदर केसांसाठी शक्य ते सारं काही आपण करतो. पण जेव्हा याच केसांमध्ये रुपेरी छटा दिसू लागतात तेव्हा ते चिंतेचं कारण बनतं. विशेषतः जर कमी वयात केस पांढरे होऊ लागले तर चिंता अधिकच वाढते.

१९ वर्षांची ऋचा मासिकपाळीच्या अनियमितपणाबद्दल तक्रार करत होती. त्या वेळी तिच्या आईने तिची अजून एक व्यथा सांगितली. 'डॉक्टर जवळ जवळ वर्ष झालं तेव्हापासून ऋचाच्या केसांना डाय लावावा लागतो. कॉलेजमध्ये कुणी चिडवू नये म्हणून ती नियमित केस रंगवते! लहानपणी एखाद्दुसरा पांढरा केस डोक्यावर दिसे. तो उपटून टाकल्यामुळे असेल किंवा पाळी सुरू झाल्यामुळे असेल, पण हा त्रास खूपच वाढला.' अशा प्रकारच्या अनेक ऋचा आजूबाजूला खूप आढळतात. त्यांच्या समस्यांचं निराकरण करण्याचा हा प्रयत्न-

आयुर्वेदानुसार केस हा हाडांचाच शुद्ध भाग आहे. खाल्लेल्या अन्नाचं पचन होऊन त्यातील पोषक भागापासून हाडांचा भाग तयार होतो आणि त्याचाच मलभाग म्हणजे केस! पोषक द्रव्यांच्या अभावामुळे केस गळणे, पांढरे होणे अशा समस्या निर्माण होऊ शकतात. ऋचाच्या बाबतीत नेमकं तेच घडलं. जीवनसत्त्वं, हिमोग्लोबीन आणि लोहतत्त्वाच्या अभावामुळेही केसांवर दुष्परिणाम होतो. पोषक आहार घेऊनही पचनाच्या अभावीही असे त्रास निर्माण होतात. निसर्गतःच पित्तप्रकृतीच्या स्त्रियांचे (गोरा वर्ण, पिंगट डोळे-केस, सुकुमार बांधा, हुशार इ. वर्णनाच्या स्त्रिया) केस अकाली पांढरे होतात व गळतात. मेलॅलिन या रंगद्रव्यामुळे केसांना काळेपणा येतो. वयोपरत्वे केस पांढरे होऊ शकतात. पण याव्यतिरिक्तही अकाली केस पांढरे होण्याची काही कारणं आहेत.




आयुर्वेदानुसार केस हा हाडांचाच शुद्ध भाग आहे. खाल्लेल्या अन्नाचं पचन होऊन त्यातील पोषक भागापासून हाडांचा भाग तयार होतो आणि त्याचाच मलभाग म्हणजे केस! पोषक द्रव्यांच्या अभावामुळे केस गळणं, पांढरे होणं अशा समस्या निर्माण होऊ शकतात.

## केस अकाली पांढरे का होतात?

- अनुवंशिकता
- उन्हात फिरणं
- रासायनिक शाम्पूचा अतिरिक्त वापर
- काही औषधांचा दुष्परिणाम
- खारट, क्षारयुक्त पदार्थांचं अतिरेकी सेवन
- डोकेदुखी, त्वचाविकार, मुदतीचा ताप, झोपेच्या विकृती, उष्णता इ. गोष्टींचा केसांवरही अप्रत्यक्ष परिणाम होतो.



## उपचार

- वैद्यकीय सल्ल्यानुसार ताज्या मक्याचा रस, त्रिफळा, आवळा, रसायन चूर्ण याचा उपयोग पचनासाठी किंवा पोषणासाठी करावा.
- शिरोधार, नस्य, शिरोअभ्यंग इ. पंचकर्मं तज्ज्ञांच्या सल्ल्याने करावीत.
- जास्वंदीच्या फुलाचा लेप, महाभृंगराज तेल, जास्वंद तेल केसांना लावावं.
- केसांत ओलावा राहणार नाही, याची काळजी घ्यावी. दिवसातून २-३ वेळा केस विंचरावेत.
- शाम्पू सतत बदलू नये. कलप, साबण वापरू नये.
- जेवणात फरसाण, आंबवलेले पदार्थ, शिळे निकृष्ट अन्न, लोणचं, पापड यांचा वापर टाळावा.
- सालींसकट डाळी, सकस अन्न, हातसडीचे तांदूळ, ताजी फळं, आवळा, गूळ जेवणात समाविष्ट करावा. तसेच काळ्या मनुका पाण्यात भिजवून खाव्यात.
- चिंता, जागरण करू नये तसंच अंघोळ करताना खूप गरम पाणी डोक्यावर घेऊ नये.
- केस धुण्यासाठी शिकेकाई, आवळा, नागरमोथा यांचा काढा वापरावा.

# लाल भोपळ्याचं सूप






**साहित्य -**
अर्धा किलो साल काढलेला लाल भोपळा,
दोन लवंगा,
लसणाच्या दोन पाकळ्या,
काळीमिरी पावडर,
अक्रोडचे तुकडे,
आवडीनुसार मोड आलेलं कडधान्य,
कोंथिबीर,मीठ.

**कृती –** भोपळ्याची साल काढून तो स्वच्छ करा. त्याचे मोठे तुकडे करा. भोपळ्यात दोन लसूण पाकळ्या घालून कुकरमध्ये शिजवून घ्या. थंड झाल्यावर ते मिश्रण व्यवस्थित एकत्र करा. त्यात मीठ, काळीमिरी पावडर घालून ते मिश्रण उकळवा. उकळी आल्यावर त्यात अक्रोडचे तुकडे आणि मोड आलेलं कडधान्य घाला. कोथिंबीर घालून सजवा.

# laughing ज़ोन

न्यायालयात आरोपीच्या शिक्षणाबद्दल वकील त्याची उलटतपासणी घेत होते.
'तुम्ही कधी कॉलेजला गेला होता काय?'
'हो गेलो होतो.'
'एस.एस.सी. पास झाल्याचा दाखला आहे का?'
'नाही.' आरोपी म्हणाला.
'मग कॉलेजमध्ये गेलात तरी कशाला?' वकिलाने रागाने विचारले.
'एकदा कॉलेजजवळून जात असताना अचानक पाऊस आला म्हणून गेलो साहेब. पाऊस थांबल्यावर लगेच बाहेर पडलो.

# हॅव अ प्रिटी लूक

**आयुष्यभर सुंदर दिसणं कुणाला आवडणार नाही? खरं तर, सौंदर्याची जपणूक फार अवघड नाही. त्यासाठी इच्छा असणं आणि थोडा वेळ देणं मात्र आवश्यक आहे. विश्वास बसत नसेल तर हे करून पाहा अँड हॅव अ प्रिटी लूक!**



## तजेलदार त्वचा

त्वचा फार तेलकट असेल तर क्रीम पावडर फाऊंडेशनचा वापर करावा. पण सामान्य, मिश्र, कोरड्या त्वचेवर याचा वापर टाळावा. अन्यथा त्वचेतील ओलावा शोषून घेतला जाईल. मेकअप केल्यानंतरही कोरड्या त्वचेतील ओलावा टिकून राहील, याची काळजी घ्यावी.

## 'ब्लो ड्राय'चा पर्याय

रसायनांचा वापर करून केस सरळ (स्ट्रेट) करण्यापेक्षा एक-दोन दिवसांतून एकदा केसांना ब्लो ड्रायच्या साहाय्याने सरळ करण्यास हरकत नाही. हेअर एक्सपर्ट्सच्या मते, एक दिवसाआड ब्लो ड्राय करण्यास हरकत नाही. कमी हीट सेट केल्याने केसांना नुकसान पोहोचत नाही. अशाप्रकारे रसायनांमुळे केसांचं नुकसान होणं टळतं आणि बजेटमध्ये केस स्ट्रेट होतात.

तत्पूर्वी केसांना ब्लो ड्राय करण्याची योग्य पद्धत जाणून घेणं आवश्यक आहे. त्यासाठी हेअर स्टाइलिस्टकडून योग्य पद्धत समजून घ्यावी. जेणेकरून बाहेर किंवा विशेष समारंभासाठी जाताना तुम्ही स्वतःच केस ब्लो ड्राय करू शकाल.

## रेझर नको

हातापायांवरील किंवा काखेतील केस काढण्यासाठी चुकूनही रेझरचा वापर करू नये. रेझरचा वापर केल्याने नव्याने उगवणारे केस राठ येतात. वॅक्स त्यासाठी चांगला पर्याय आहे. त्वचेला एक्सफोलिएट करून त्या भागावर वॅक्स करावं. पुन्हा एक्सफोलिएट करावं. असं केल्याने त्वचा कोमल होते.



## गहिरे डोळे

## परफेक्ट टूल्स

मेकअप करायचा असो की केस सेट करायचे असो प्रत्येक कामासाठी योग्य मेकअप ब्रश /हेअर ब्रशचा वापर करणं आवश्यक आहे. त्यामुळे योग्य परिणाम साधला जातो. मेकअप जितका बारकाईने करावा तितकं सौंदर्य खुलतं. त्यासाठी परफेक्ट टूल्स वापरणं महत्त्वाचं आहे.

## मेकअप बॅग

मेकअप बॅग नेहमी तयार ठेवा. मेकअपचं साहित्य वेगवेगळ्या ठिकाणी न ठेवता एकाच बॅगमध्ये ठेवावं. म्हणजे त्याचा वापर सोपा आणि नियमित होतो. मेकअप प्रोडक्ट्सच्या एक्सपायरी डेटवरही लक्ष ठेवणं महत्त्वाचं असतं. नाजूक चेहऱ्याचं मोल जपायचं तर त्यासाठी साहित्यही चांगल्या प्रतीचं वापरायला हवं.



ANI THE RIGHT KIND OF PEOPLE
**एएनआय इंटिग्रेटेड सर्व्हिसेस लिमिटेड**
कॉर्पोरेट आयडेंटिफिकेशन क्रमांक : L29268MH2008PLC184326
नोंदणीकृत कार्यालय : ६२४, लोढा सुप्रीमस २, ए विंग, नॉर्थ टॉवर्स, रोड क्र. २२, न्यु पासपोर्ट कार्यालयजवळ, वागळे इस्टेट, ठाणे पश्चिम ठाणे महाराष्ट्र ४०० ६०४ भारत.
दूर. क्र. +९१-२२-६१५६०४०४ ईमेल : cs@aniintegrated.com
वेबसाइट : https://www.aniintegratedservices.com

**१३ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेकरिता भागधारक यांना सूचना**

सूचना याद्वारे देण्यात येत आहे की, एएनआय इंटिग्रेटेड सर्व्हिसेस लिमिटेड (कंपनी) ची वार्षिक सर्वसाधारण सभा (एजीएम) सोमवार, दि. २६ सप्टेंबर, २०२२ रोजी दु. ४.०० वा. व्हिडीओ कॉन्फरेंसिंग (व्हीसी)/ अन्य ऑडिओ व्हिज्युअल मीन्स (ओएव्हीएम) मार्फत आयोजित केली आहे कॉर्पोरेट अफेअर्स मंत्रालय (एमसीए) अंतर्गत सामान्य सर्क्युलर क्र. २/२०२२ व १९/२०२१, अन्य सर्क्युलर अनुसार कॉर्पोरेट अफेअर्स मंत्रालायाद्वारे जारी (एमसीए) व सर्क्युलर सेबी/एचओ/सीएफडी/सीएमडी२/सीआयआरपी/२०२२/१६२ दि. १३ मे, २०२२ अनुसार सेबी (सर्क्युलर म्हणून यापुढे एकत्रितरित्या संदर्भित) व सर्व अन्य लागू कायदा अनुसार एजीएमच्या सूचनेमध्ये पार पडलेल्या व्यवसायांवर व्यवहार करण्याकरिता आयोजित केली आहे. एजीएमची सूचनेची ईलेक्ट्रॉनिक प्रत दि. ०४ सप्टेंबर, २०२२ रोजी सर्व सभासदांना ईमेल आयडी मार्फत कंपनी/डिपॉझिटरी यांच्यासह नोंदीकृत पाठवले आहे. सभासदांनी कृपया नोंद घ्यावी की, एजीएमची सूचना व वार्षिक अहवाल २०२१-२२ कंपनीची वेबसाइट www.aniintegratedservices.com वर नॅशनल स्टॉक एक्सचेंज ऑफ इंडिया लिमिटेड वेबसाइट www.nseindia.com वर उपलब्ध आहे. कंपनी कायदा, २०१३ च्या अनुच्छेद १०३ एजीएमच्या मार्फत व्यवसाय करण्यात येतील. त्यामुळे, सभासदांनी ईजीएममध्ये सहभागी होण्याकरिता व्हीसी/ ओएव्हीएम मार्फत उपस्थित राहावे.

पुढे अधिसूचित करण्यात येते की, कंपनी कायदा, २०१३ च्या अनुच्छेद ९१ अंतर्गत सभासदांचे रजिस्ट्रर व कंपनीचे शेअर ट्रान्सफर बुक्स शनिवार, दि. १७ सप्टेंबर, २०२२ ते शुक्रवार, दि. २३ सप्टेंबर, २०२२ (दोन्ही दिवस समाविष्ट) दरम्यान बंद राहिल.

सूचना याद्वारे देण्यात येते की, सेबी (सूची अनिवार्यता व विमोचन आवश्यकता) विनियमन २०१५ च्या विनियमन ४४ व कंपनी कायदा, २०१३ च्या अनुच्छेद १०८ अंतर्गत कंपनीने परोक्ष ई-मतदान सुविधा (परोक्ष इई-मतदान) सर्व सभासदांना एजीएमच्या सूचनेमध्ये पार पडलेल्या ठरावांवर मतदान करण्याकरीत आयोजित केले आहे. त्यानुसार, कंपनीने एजीएमच्या दरम्यान ई-मतदान प्रणाली मार्फत मतदान करावे. (ई-मतदान)

१. ईलेक्ट्रॉनिक मीन्स द्वारे मतदान मार्फत एजीएमच्या सूचनेमध्ये पार पडलेले व्यवसाय.
२. परोक्ष ई-मतदान शुक्रवार, दि. २३ सप्टेंबर, २०२२ स. ९.०० वा. सुरु होत आहे.
३. परोक्ष ई-मतदान रविवार, दि. २५ सप्टेंबर, २०२२ रोजी ५.०० वा. संपेल.
४. एजीएमच्या ठिकाणी ईलेक्ट्रॉनिक मीन्स मार्फत मतदान करण्यास सक्षम निर्धारित तारीख सोमवार दि. १९ सप्टेंबर, २०२२ आहे.
५. सभासदांना एजीएममध्ये परोक्ष ई-मतदान सुविधेच्या माध्यमातून एजीएमच्या सूचनेत विहित विषयांवर आपले मत देण्याची संधी असेल व निर्धारित तारीख सोमवार, दि. १९ सप्टेंबर, २०२२ रोजी evoting@nsdl.co.in वर विनंती पाठवून लॉगीन आयडी व पासवर्ड प्राप्त करावा.

सभासदांनी कृपया नोंद घ्यावी की :
ए. कोणाही व्यक्तीस ज्यांनी कंपनीचे शेअर्स संपादन केलेले आहेत त्यांना एनएसडीएल वेबसाइट वर कंपनीची वेबसाइट वर परोक्ष ई-मतदान माहिती प्रकाशन केली आहे व निर्धारित तारीख अनुसार एजीएमची सूचना व शेअर्स धारक यांना पाठवणी पूर्ण केली आहे.
बी. एनएसडीएल द्वारे ई-मतदान मार्फत एजीएमच्या ठिकाणी मतदानाकरिता सुविधा उपलब्ध आहे.
सी. सभासद ज्यांचे ईमेल आयडी डिपॉझिटरीजसह नोंदणीकृत नाही आहेत त्यांनी सदर पूर्वी खालील स्वरूपात एजीएमच्या सूचनेमध्ये प्रस्तावित ठरावांकरिता ई-मतदानाकरिता लॉगीन क्रेडेंशिअल प्राप्त करावे.
डी. एखाद्या व्यक्तीचे नाव जर सभासदांचे रजिस्ट्रर व लाभार्थी मालक यांच्या रजिस्ट्रमध्ये उपलब्ध नसेल तर परोक्ष ई-मतदान सुविधा प्राप्त करण्याकरिता निर्धारित तारीख अनुसार डिपॉझिटरीज प्रदान केले आहे.

कोणत्याही चौकशीकरिता तुम्ही ई-मतदान युजर मॅन्युअल व Frequently Asked Question (FAQs) पाहावे व डाउनलोड सेक्शन https://www.evoting.nsdl.com वर वा ईमेल evoting@nsdl.co.in वर वा एनएसडीएल सह संपर्क साधावा वा टोल फ्री क्रमांक १८०० १०२० ९९०/१८०० २२४ ४३० वा कंपनीस ईमेल cs@aniintegrated.com ईलेक्ट्रॉनिक मीन्स मार्फत मतदानासह संपर्क साधावा.

**एएनआय इंटिग्रेटेड सर्व्हिसेस लिमिटेड यांच्याकरिता व वतीने**
सही/-
नविन कोरपे
व्यवस्थापकीय संचालक
डीआयएन - ०२२००९२८
पत्ता : फ्लॅट क्र. ६, आशिर्वाद जी. व्ही. स्कीम
रोड क्र. १, मुलुंड पूर्व, मुंबई ४०० ०८१.

ठिकाण : मुंबई
दिनांक : ०३ सप्टेंबर, २०२२